मंगळवार दि. १८ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## बाजार चौक ते मिलन चौक परिसरातील अतिक्रमणांवर महापालिकेची धडक कारवाई; तीन टपऱ्यांना दंड, दोन टपऱ्या जप्त

### रस्ते, पदपथ मोकळे करण्यासाठी अतिक्रमण विभागाची विशेष मोहीम; पुन्हा अतिक्रमण केल्यास कठोर कारवाईचा इशारा

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील प्रमुख रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक जागांवरील अनधिकृत अतिक्रमणांविरोधात महानगरपालिका प्रशासनाने पुन्हा एकदा धडक मोहीम हाती घेतली आहे. आयुक्त अंजली शर्मा यांच्या निर्देशानुसार सोमवारी (१७ ऑगस्ट) अतिक्रमण विभागाने बाजार पोलीस चौक ते मिलन चौक तसेच मिलन चौक ते मुजाहिद चौक परिसरात विशेष कारवाई केली. या कारवाईमुळे रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या अनधिकृत टपऱ्या आणि वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमण हटविण्यात आले.

महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने केलेल्या पाहणीत या परिसरात एकूण १२ अतिक्रमणे आणि पाच टपऱ्या आढळून आल्या. त्यापैकी तीन टपरीधारकांवर नियमानुसार कारवाई करत प्रत्येकी पाच हजार रुपये, असा एकूण १५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. तर दोन अनधिकृत टपऱ्या जप्त करण्यात आल्या.

शहरातील वाढती वाहतूक, अरुंद होत जाणारे रस्ते आणि पदपथांवर वाढणाऱ्या अनधिकृत व्यावसायिक वापरामुळे नागरिकांना अनेकदा रस्त्यावरूनच चालावे लागते. परिणामी वाहनांची कोंडी होण्यासोबतच पादचारी आणि वाहनचालकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने सार्वजनिक रस्ते आणि पदपथ अतिक्रमणमुक्त करण्याची मोहीम अधिक तीव्र केली आहे.



**अतिक्रमण पुन्हा झाल्यास थेट कायदेशीर कारवाई**

कारवाईनंतर महापालिका प्रशासनाने संबंधित अतिक्रमणधारकांना स्पष्ट इशारा दिला आहे. ज्या ठिकाणी अतिक्रमण हटविण्यात आले आहे, त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण आढळल्यास संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. केवळ अतिक्रमण हटविण्यावर कारवाई थांबविली जाणार नसून, अतिक्रमण हटविण्यासाठी झालेला खर्चही संबंधितांकडून वसूल करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**टपऱ्या, हातगाड्यांमुळे वाहतुकीला अडथळा**

शहरातील प्रमुख मार्गांवर रस्त्याच्या कडेला अनधिकृतपणे टपऱ्या, हातगाड्या किंवा अन्य प्रकारचे व्यवसाय उभारले जात असल्याने वाहतुकीच्या जागेवर अतिक्रमण होते. काही ठिकाणी पदपथ व्यापले जात असल्यामुळे पादचाऱ्यांना थेट मुख्य रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता असते.

महापालिकेने नागरिक आणि व्यावसायिकांना सार्वजनिक रस्ते, पदपथ अथवा शासकीय जागेवर अनधिकृतपणे अतिक्रमण करू नये, असे आवाहन केले आहे. अनधिकृत टपऱ्या किंवा हातगाड्या लावून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्ध पुढील काळातही दंडात्मक तसेच अतिक्रमण हटावाची कारवाई सुरू राहणार आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कारवाई**

ही कारवाई सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी अतिक्रमण विभाग प्रमुख शोएब खान, स्वच्छता विभाग प्रमुख सुधीर डहाळे, अतिक्रमण विभागातील कर्मचारी तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रमुख मार्गांवरील कारवाई कायम राहणार**

बाजार चौक ते मिलन चौक हा शहरातील महत्त्वाचा वर्दळीचा मार्ग असून, या परिसरातील अतिक्रमणांमुळे वाहतुकीवर परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली. महापालिका प्रशासनाने शहरातील इतर प्रमुख मार्गांवरही अतिक्रमणविरोधी मोहीम सातत्याने राबविण्याचे स्पष्ट केले आहे.

दरम्यान, अतिक्रमण हटविल्यानंतर संबंधित जागांवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून देखरेख ठेवली जाणार का, तसेच जप्त केलेल्या टपऱ्यांबाबत पुढील प्रक्रिया काय असेल, याकडेही नागरिकांचे लक्ष लागले आहे. शहरातील रस्ते आणि पदपथ कायमस्वरूपी अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या पुढील कारवाईला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## रेवगाव रोडवर दोन गावठी पिस्टलसह तरुण जेरबंद; ८० हजारांचा शस्त्रसाठा जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; कानडी बस्तीतील २५ वर्षीय सुमित भुरेविरुद्ध गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर व जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली असतानाच स्थानिक गुन्हे शाखेने दोन गावठी पिस्टल बाळगणाऱ्या २५ वर्षीय तरुणाला जेरबंद केले. रेवगाव रोडवरील कलश सिडस बीएसएस फार्मसमोरील रस्त्यावर सोमवारी (१७ ऑगस्ट) ही कारवाई करण्यात आली. आरोपीकडून सुमारे ८० हजार रुपये किमतीच्या दोन



गावठी बनावटीच्या पिस्टल जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात अवैधरीत्या शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी पथकाला मार्गदर्शन करून अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली होती.

**रेवगाव रोडवर पोलिसांना मिळाली माहिती**

सोमवारी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व्यक्तींचा शोध घेत असताना सुमित ऊर्फ गोल्या राजू भुरे (वय २५, रा. कानडी बस्ती, जालना) हा दोन गावठी पिस्टल घेऊन रेवगाव परिसरात असल्याची *(पान २ वर)*



शहागड येथून निघालेली कावड दिंडी शहागड अंबड मार्गे जालना पंचमुखी येथे या दिंडीचे समापन होणार आहे कावड दिंडी येण्यासाठी दोन दिवस लागतात ***छायाचित्र किरण खानापुरे***

## श्रावण मासात जालन्यात नऊ दिवस रामचरितमानस नवान्ह पारायण

### *१८ ते २६ ऑगस्टदरम्यान श्रीराम मंदिरात आयोजन; तुलसीदास जयंतीनिमित्त भाविकांना भक्ती, संस्कार आणि सदाचाराचा संदेश*

**जालना । प्रतिनिधी**

पवित्र श्रावण मास आणि महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून जालना शहरात नऊ दिवसांचा आध्यात्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. श्री राम सुंदरकांड सत्संग महिला परिवार, जालना यांच्या वतीने श्री रामचरितमानस नवान्ह पारायणाचे आयोजन करण्यात आले असून, १८ ते २६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत दररोज दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हा धार्मिक कार्यक्रम होणार आहे.



हा सोहळा श्री राम मंदिर, आर.पी. रोड, जालना येथे आयोजित करण्यात आला आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या पारायणात रामचरितमानसचे भावपूर्ण वाचन, सत्संग आणि प्रभू श्रीरामांच्या जीवनचरित्रातून मिळणाऱ्या आध्यात्मिक व नैतिक संदेशाचे निरूपण केले जाणार आहे.

**तुलसीदास जयंतीनिमित्त विशेष महत्त्व**

१९ ऑगस्ट रोजी श्रीरामचरितमानसचे रचयिता गोस्वामी तुलसीदास महाराज यांची जयंती आहे. याच पार्श्वभूमीवर नवान्ह पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. तुलसीदासांनी प्रभू श्रीरामांच्या चरित्रातून समाजासमोर भक्ती, संस्कार, सदाचार, कर्तव्य, सेवा आणि मर्यादा यांचे आदर्श मांडले. त्यामुळे तुलसीदास जयंती आणि रामचरितमानस पारायणाचा हा योग भाविकांसाठी विशेष आध्यात्मिक पर्व ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. रामचरितमानस हा केवळ धार्मिक ग्रंथ म्हणून न पाहता त्यातील मूल्याधिष्ठित विचार आणि जीवनमूल्ये समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

पंडित मनोजजी महाराजांचे रामचरितमानस वाचन या *(पान २ वर)*

## सामनगाव रोडवर अवैध वाळू वाहतुकीवर एलसीबीची धडक; ४५.५० लाखांचे दोन हायवा जप्त

### विनापरवाना वाळू वाहतूक करताना दोन वाहने पकडली; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीविरोधात पोलिसांनी कारवाईचा मोर्चा वळविला असून, स्थानिक गुन्हे शाखेने सामनगाव रोडवर मोठी कारवाई केली आहे. विनापरवाना वाळूची चोरटी वाहतूक करणारे दोन हायवा पकडण्यात आले असून, वाळूसह या दोन्ही वाहनांची एकूण किंमत ४५ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणी दोन चालकांसह संबंधित हायवा मालकांविरुद्ध तालुका पोलीस ठाणे, जालना



येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी जिल्ह्यात विनापरवाना वाळू वाहतूक करणाऱ्यांविरोधात प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाकडून अवैध वाळू वाहतुकीवर लक्ष ठेवण्यात येत होते.

**गुप्त माहितीच्या आधारे सापळा**

रविवारी (१६ ऑगस्ट) स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत सामनगाव रोडने दोन हायवा विनापरवाना वाळूची वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच ती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दोन पंचांसह संबंधित ठिकाणी रवाना झाले. पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे सामनगाव रोडवर छापा टाकला. *(पान २ वर)*

## सहाय्यक पोलीस आयुक्त सुभाष भुजंग यांना उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पदक

### स्वतंत्र सैनिक पाल्य समितीकडून सत्कार



जालना (प्रतिनिधी) - छत्रपती संभाजी नगर येथील सहाय्यक पोलीस आयुक्त श्री सुभाष नानासाहेब भुजंग यांना २०२६ यावर्षी एकाच वेळी व उल्लेखनी सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक आणि केंद्रीय गृहमंत्रालयाचा अतिउत्कृष्ट सेवा पदक अशा दुहेरी सन्मानाने गौरविण्यात येत आहे. १९९२ मध्ये पोलीस उपनिरीक्षक म्हणून रुजू झालेले सुभाष भुजंग यांना

२०१८ मध्ये पोलीस महासंचालक सन्मान चिन्ह २०२० मध्ये गुणवंतापूर्वक सेवेसाठी राष्ट्रपती पदक प्राप्त झाले *(पान २ वर)*

## मनसेची जालन्यात आढावा बैठक; संघटनात्मक बांधणीसह आगामी निवडणुकांच्या तयारीवर चर्चा

### संपर्क अध्यक्ष माजी आ. प्रकाश बावस्कर यांच्या कार्यकर्त्यांना संघटन मजबूत करण्याच्या सूचना

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या (मनसे) संघटनात्मक बांधणीला वेग देण्याच्या दृष्टीने जालना येथे पक्षाची आढावा बैठक घेण्यात आली. मनसेचे संपर्क अध्यक्ष तथा माजी आमदार प्रकाश बावस्कर यांच्या जालना दौऱ्यादरम्यान ही बैठक पार पडली. आगामी काळातील राजकीय घडामोडी, पक्षाची संघटनात्मक स्थिती, स्थानिक पातळीवरील जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांची भूमिका याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. जालना जिल्ह्यात मनसेची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी बूथस्तरापासून पक्षाची



बांधणी करण्यावर भर देण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. शहरासह ग्रामीण भागात पक्षाचा जनसंपर्क वाढवून नागरिकांच्या स्थानिक प्रश्नांवर आक्रमकपणे आवाज उठविण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना करण्यात आले.

**बावस्कर यांचा जालना दौरा**

मनसेचे संपर्क अध्यक्ष माजी आमदार प्रकाश बावस्कर यांनी जालना दौरा करून पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. या वेळी त्यांनी जिल्ह्यातील पक्ष संघटनेचा आढावा घेतला. विविध भागातील संघटनात्मक परिस्थिती, पदाधिकाऱ्यांच्या कामकाजाचा आढावा तसेच पक्षाच्या आगामी उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली.

स्थानिक प्रश्नांवर सातत्याने आंदोलने आणि जनआंदोलनाच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची भूमिका पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली. केवळ निवडणुकीपुरते मर्यादित न राहता वर्षभर जनतेमध्ये राहून पक्षाची प्रतिमा मजबूत करण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली.

**नवीन कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश**

बैठकीदरम्यान काही कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र *(पान २ वर)*

# संपादकीय...

## घोषणांचा पाऊस, अंमलबजावणीचे काय?

जिल्ह्याच्या विकासाचा आढावा घेताना सरकारच्या विविध योजना, डिजिटल सेवा, रोजगाराच्या संधी, पशुधनासाठी सुविधा, महसूल सेवा घरपोच करण्याचे उपक्रम आणि जलसंधारण अभियान यांची मोठी यादी समोर येते. कागदावर पाहता चित्र निश्चितच आशादायी आहे. मात्र, योजनांची संख्या वाढणे म्हणजे विकास झाला असे मानायचे का? हा खरा प्रश्न आहे. जालना जिल्ह्यात 'ई-पशुसेवा ॲप', 'ऊसमित्र' पोर्टल, 'जालना मित्र' घरपोच शासकीय सेवा, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना, युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि जलसंधारण अभियान अशा अनेक उपक्रमांची घोषणा झाली आहे. या योजनांचा उद्देश निश्चितच चांगला आहे. परंतु त्यांचा खरा फायदा शेवटच्या घटकापर्यंत किती पोहोचतो, हे तपासणे अधिक महत्त्वाचे आहे.

डिजिटल सेवा की डिजिटल अडथळे?

'जालना मित्र'च्या माध्यमातून नागरिकांना घरपोच शासकीय सेवा मिळणार असतील तर ही स्वागतार्ह बाब आहे. महसूल कार्यालयांच्या फेऱ्या कमी झाल्या, कागदपत्रांसाठी दलालांची गरज भासली नाही आणि नागरिकांचा वेळ व पैसा वाचला, तरच या उपक्रमाचे यश मानता येईल.

आजही ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना ऑनलाइन प्रक्रिया, कागदपत्रांचे अपलोड, अर्जाची स्थिती तपासणे याबाबत अडचणी येतात. त्यामुळे डिजिटल सेवा सुरू करण्याबरोबरच डिजिटल साक्षरता आणि प्रत्यक्ष मदत केंद्रे सक्षम करणेही गरजेचे आहे.

पहिल्या टप्प्यात ६४ मंडळांमध्ये समाधान शिबिरांतून सुमारे ४० हजार लाभार्थ्यांना सेवा मिळाल्याचा दावा आहे. ही संख्या निश्चितच मोठी आहे. मात्र, किती प्रकरणे प्रत्यक्ष निकाली निघाली, किती अर्ज प्रलंबित आहेत आणि नागरिकांच्या समस्या कायमस्वरूपी सुटल्या का, याची माहितीही सार्वजनिक झाली पाहिजे.

रोजगाराच्या आकडेवारीपलीकडे वास्तव काय?

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत १,७०० प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण पूर्ण केले आणि त्यांना १० कोटी ८३ लाख रुपयांचे विद्यावेतन ऑनलाइन देण्यात आले, ही बाब सकारात्मक आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून ४२३ उद्योग उभे राहिल्याचेही सांगितले जाते.

पण प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर किती युवकांना कायमस्वरूपी रोजगार मिळाला? ४२३ उद्योगांपैकी किती उद्योग आज प्रत्यक्ष उत्पादन करत आहेत? किती उद्योग बंद पडले? किती उद्योगांनी स्थानिक तरुणांना रोजगार दिला? या प्रश्नांची उत्तरेही तितकीच महत्त्वाची आहेत.

आजच्या तरुणाला केवळ प्रशिक्षण किंवा अनुदान नको आहे; त्याला टिकणारा व्यवसाय आणि स्थिर उत्पन्न हवे आहे. त्यामुळे योजनांची खरी कसोटी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा होण्यात नसून त्यांच्या उत्पन्नात किती वाढ झाली, यात आहे.

पशुपालकांसाठी योजना; पण पशुवैद्यकीय यंत्रणा सक्षम आहे का? 'ई-पशुसेवा ॲप'च्या माध्यमातून पशुपालकांना घरबसल्या प्राथमिक सल्ला आणि उपचाराचे मार्गदर्शन मिळणार आहे. तंत्रज्ञानाचा हा वापर ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त ठरू शकतो.

मात्र, ॲपवर सल्ला मिळाल्यानंतर प्रत्यक्ष पशुवैद्यकीय सेवा किती वेळात उपलब्ध होईल? ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये डॉक्टर, औषधे आणि आवश्यक सुविधा पुरेशा आहेत का? या प्रश्नांकडेही प्रशासनाने पाहणे गरजेचे आहे. 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना' सुरू होताना लाभार्थ्यांची निवड पारदर्शक झाली पाहिजे. अनुदान थेट खात्यात जमा होणे चांगले; पण लाभार्थ्याला मिळालेल्या गायी-म्हशींची उत्पादकता, पशुधनाचे आरोग्य, चारा, बाजारपेठ आणि दूधाला मिळणारा दर यांचा विचार नसेल तर योजना केवळ अनुदान वाटपापुरती मर्यादित राहू शकते.

जलसंधारण : सप्ताह नव्हे, सातत्य हवे!

१५ ते २१ ऑगस्टदरम्यान जलसंधारण सप्ताह आणि १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ दरम्यान जलसंधारण अभियान राबविले जाणार आहे. 'वॉक फॉर वॉटर'सारख्या जनजागृती उपक्रमातून पाण्याचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविणे चांगलेच. पण जालन्यासारख्या दुष्काळी प्रवृत्तीच्या जिल्ह्यात पाण्याचा प्रश्न केवळ जनजागृतीने सुटणार नाही. नाला खोलीकरण, बंधारे, जलसाठे, भूजल पुनर्भरण, गाळ काढणे आणि पाण्याचा काटेकोर वापर यावर प्रत्यक्ष काम झाले पाहिजे. जलसंधारणासाठी खर्च झालेल्या निधीचा परिणाम किती झाला, किती हेक्टर क्षेत्राला फायदा झाला आणि भूजलपातळीत किती सुधारणा झाली, याचे मोजमाप दरवर्षी झाले पाहिजे.

घोषणांपेक्षा 'परिणाम अहवाल' हवा

पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते विविध योजनांचे लोकार्पण झाले, लोगोचे अनावरण झाले, सायकल रॅलीला हिरवी झेंडी दाखविण्यात आली. जनजागृती आणि प्रशासनातील उत्साहासाठी हे उपक्रम आवश्यक आहेत. पण कार्यक्रम संपल्यानंतर योजनांचा खरा प्रवास सुरू होतो.

जिल्ह्यातील नागरिकांना आता उद्घाटनांचे फोटो किंवा घोषणांची यादी नको आहे. त्यांना रस्ते, पाणी, रोजगार, शेती, महसूल सेवा, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष बदल हवा आहे. सरकारने प्रत्येक मोठ्या योजनेसाठी 'लक्ष्यलाभार्थीखर्चप्रत्यक्ष परिणाम' असा सार्वजनिक अहवाल देण्याची पद्धत सुरू केली तर प्रशासनातील पारदर्शकता वाढेल आणि योजनांचे मूल्यमापनही वस्तुनिष्ठपणे करता येईल.


दैनिक युवा आदर्श दि. १८-०८-२०२६

CHANGE IN NAME

Old Name

**ANJUMBANO**

New Name

**ANJUM SYED AZEEM**

Address - NATIONAL NAGAR

AU.BAD ROAD, JALNA

9028243305


# राष्ट्रवादी भवनात जालना जिल्ह्याचा आढावा; तरुणांना जोडून पक्षबांधणीला वेग देण्याचे निर्देश

## शरद पवार, शशिकांत शिंदे, सुप्रिया सुळे व रोहित पवारांच्या उपस्थितीत बैठक; मनपा निवडणुकीतील पराभवाच्या कारणांवरही चर्चा

**मुंबई । विशेष प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटना पुन्हा मजबूत करण्यासाठी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने आक्रमकपणे पक्षबांधणी करण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबईतील राष्ट्रवादी भवन येथे रविवारी (१६ ऑगस्ट) झालेल्या जिल्हानिहाय आढावा बैठकीत जालना जिल्ह्यातील आठही तालुक्यांतील पक्ष संघटना, विधानसभा मतदारसंघनिहाय राजकीय परिस्थिती, आगामी रणनीती तसेच महानगरपालिका निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे आणि आमदार रोहित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. जालना जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक ताकद नव्याने उभी करण्यासाठी वरिष्ठ नेतृत्वाने स्थानिक पदाधिकाऱ्यांना दिशा दिल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

**आठही तालुक्यांतील संघटनेचा आढावा**

बैठकीत जालना जिल्ह्यातील आठही तालुक्यांमधील पक्ष संघटनेची सद्यस्थिती तपासण्यात आली. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील राजकीय परिस्थिती, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे जाळे, जनसंपर्क आणि आगामी काळातील संघटनात्मक आव्हाने यावर चर्चा झाली.

जिल्हाध्यक्ष ॲड. संजय काळबांडे यांनी जिल्ह्यातील पक्ष संघटनेची सविस्तर माहिती वरिष्ठ नेतृत्वासमोर मांडली. पक्षबांधणीचे काम वेगाने सुरू असून कार्यकर्त्यांना सक्रिय करून संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी मंत्री राजेश भैय्या टोपे यांच्या नेतृत्वाखाली जालना जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसची संघटना पुन्हा नव्या ताकदीने उभी करण्यात येईल, असा विश्वास ॲड. संजय काळबांडे आणि राजेंद्र जाधव यांनी बैठकीत व्यक्त केल्याचे सांगण्यात आले.

**जिल्हाध्यक्षांचा सत्कार**

जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवल्याबद्दल ॲड. संजय काळबांडे यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले. यावेळी त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले तसेच जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वरिष्ठ नेत्यांकडून शुभेच्छापत्र देऊन सत्कार करण्यात आला.

बैठकीत जालना जिल्ह्यातील सक्रिय कार्यकर्त्यांच्या कामगिरीबाबतही चर्चा करण्यात आली. आगामी काळात संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी अधिक प्रभावीपणे काम करून पक्षाचा जनाधार वाढविण्यावर भर द्यावा, अशी भूमिका मांडण्यात आली.

**मनपा निवडणुकीतील पराभवावर चर्चा**

जालना शहरातील महानगरपालिका निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जालना शहर जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी निवडणुकीदरम्यान घडलेल्या राजकीय घडामोडींची माहिती वरिष्ठ नेतृत्वाला दिली.

महाविकास आघाडीतील एका मित्रपक्षाने निवडणुकीच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेससोबत दगाबाजी केल्याचा आरोप जाधव यांनी बैठकीत केल्याचे पक्षाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या कथित राजकीय समीकरणाचा पक्षाला फटका बसल्याने एकाही राष्ट्रवादी उमेदवाराला विजय मिळविता आला नाही, अशी भूमिका त्यांनी वरिष्ठ नेतृत्वासमोर मांडली.

या पराभवाच्या कारणांचे आत्मपरीक्षण करून आगामी निवडणुकांसाठी अधिक सक्षम संघटन उभारण्याची गरज बैठकीत व्यक्त करण्यात आली.

**तरुणांना पक्षाशी जोडण्यावर रोहित पवारांचा भर**

जालना जिल्ह्याची संघटनात्मक व राजकीय परिस्थिती जाणून घेतल्यानंतर वरिष्ठ नेतृत्वाने पक्षाचे काम अधिक आक्रमकपणे सुरू करण्याचे निर्देश दिले. आमदार रोहित पवार यांनी विशेषतः युवा कार्यकर्त्यांना पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणण्यावर भर दिला. जिल्ह्यातील अधिकाधिक तरुणांना पक्षाशी जोडून घेण्याचे आणि युवा नेतृत्वाला संधी देण्याचे आवाहन त्यांनी केल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

तरुणांमध्ये पक्षाची विचारधारा आणि संघटनात्मक भूमिका पोहोचविण्यासोबतच स्थानिक प्रश्नांवर युवकांनी सक्रिय भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. सोशल मीडिया, जनसंपर्क अभियान आणि स्थानिक पातळीवरील जनआंदोलनांच्या माध्यमातून युवकांना पक्षाच्या कामात सहभागी करण्याची रणनीती आखण्याची गरज बैठकीत अधोरेखित झाली.

**जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेण्याचे निर्देश**

जालना जिल्ह्यात पक्षाची ताकद पुन्हा निर्माण करण्यासाठी केवळ संघटनात्मक पदांची पुनर्रचना पुरेशी नसून जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणे आवश्यक असल्याचे वरिष्ठ नेतृत्वाने स्पष्ट केले.

शेतकरी, युवक, बेरोजगारी, पाणी, रस्ते, उद्योग, शिक्षण आणि स्थानिक नागरी प्रश्नांवर पक्षाने आक्रमक भूमिका घ्यावी, तसेच नागरिकांशी थेट संपर्क वाढवावा, अशी दिशा देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

**आगामी राजकारणासाठी राष्ट्रवादीची नव्याने तयारी**

महानगरपालिका निवडणुकीतील धक्कादायक कामगिरीनंतर जालना जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेससमोर संघटना पुन्हा उभी करण्याचे मोठे आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील वरिष्ठ नेतृत्वाच्या बैठकीला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

जिल्ह्यातील विद्यमान संघटनात्मक स्थितीचा आढावा, मनपा निवडणुकीतील घडामोडींचे आत्मपरीक्षण आणि युवा कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणावर पक्षात सहभागी करून घेण्याचा निर्णय यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस आगामी काळात जालना जिल्ह्यात अधिक आक्रमक राजकीय भूमिका घेण्याच्या तयारीत असल्याचे चित्र आहे.

आता वरिष्ठ नेतृत्वाच्या निर्देशांची जिल्हास्तरावर कितपत प्रभावी अंमलबजावणी होते, नवीन युवा कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडण्यात पदाधिकाऱ्यांना कितपत यश मिळते आणि आगामी निवडणुकांमध्ये त्याचा राजकीय फायदा राष्ट्रवादी काँग्रेसला कितपत मिळतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# पान १ व ४ वरुन...

### रेवगाव रोडवर दोन...

माहिती पोलिसांना मिळाली.

माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संबंधित परिसरात शोधमोहीम राबविली. त्यावेळी कलश सिडस बीएसएस फार्मसमोरील रेवगाव रोडवर संशयित सुमित भुरे पोलिसांच्या हाती लागला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अंगझडती घेतली असता त्याच्याकडे दोन गावठी बनावटीच्या पिस्टल आढळून आल्या.

**८० हजारांचा मुद्देमाल जप्त**

पोलिसांनी दोन्ही गावठी पिस्टल जप्त केल्या असून, त्यांची एकूण किंमत ८० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. अवैधरीत्या शस्त्र बाळगल्याप्रकरणी आरोपी सुमित ऊर्फ गोल्या राजू भुरे याच्याविरुद्ध तालुका पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, आरोपीकडे ही दोन्ही पिस्टल नेमकी कुठून आली, त्याने ती कोणाकडून घेतली होती आणि त्यांचा वापर कोणत्या कारणासाठी केला जाणार होता, याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे. या शस्त्रांचा यापूर्वी कोणत्याही गुन्ह्यात वापर झाला आहे का, याचीही पडताळणी तपास यंत्रणेकडून केली जाण्याची शक्यता आहे.

**अवैध शस्त्रांच्या नेटवर्कचा शोध घेण्याचे आव्हान**

जिल्ह्यात अधूनमधून गावठी पिस्टल, धारदार शस्त्रे किंवा इतर घातक हत्यारे जप्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या या कारवाईला महत्त्व प्राप्त झाले आहे. एखाद्या व्यक्तीकडून शस्त्र जप्त करून कारवाई करण्याबरोबरच ही शस्त्रे कुठून येतात, त्यांचा पुरवठा कोण करतो आणि त्यामागे कोणते नेटवर्क कार्यरत आहे, याचा शोध घेणे पोलिसांसमोरचे महत्त्वाचे आव्हान आहे.

विशेषतः दोन पिस्टल एकाच व्यक्तीकडे आढळल्याने तपासाची दिशा केवळ जप्तीपुरती मर्यादित न राहता शस्त्राच्या स्रोतापर्यंत पोहोचण्याकडे असण्याची शक्यता आहे. मात्र, याबाबत पोलिसांकडून अधिकृत तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि जालना उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, देविदास भोजने, आक्रुर धांडगे आणि बाबा गायकवाड यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**अवैध शस्त्रधारकांवर पोलिसांचा वॉच**

जालना जिल्ह्यात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींवर स्थानिक गुन्हे शाखेने लक्ष केंद्रित केले असून, संशयितांची माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याचे सत्र सुरू आहे. रेवगाव रोडवरील ताज्या कारवाईत दोन गावठी पिस्टल जप्त झाल्याने जिल्ह्यातील अवैध शस्त्रांच्या हालचालींबाबत पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. दरम्यान, आरोपी सुमित भुरे याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या पिस्टलचा गुन्हेगारी कारवायांसाठी वापर झाला होता का, तसेच त्याच्याशी संबंधित अन्य व्यक्ती किंवा शस्त्र पुरवठादार तपासात निष्पन्न होतात का, याकडे आता लक्ष लागले आहे.

### श्रावण मासात...

नऊ दिवसांच्या धार्मिक सोहळ्यात परमपूज्य पंडित श्री मनोजजी महाराज यांच्या पावन मुखारविंदातून श्री रामचरितमानसचे भावपूर्ण वाचन होणार आहे. यासोबतच भक्तिमय सत्संगाचेही आयोजन करण्यात आले आहे. रामचरितमानसच्या श्रवणातून जीवनात संस्कार, सदाचार, मर्यादा, कर्तव्यभावना, सेवा, प्रेम आणि भक्तीची प्रेरणा मिळते, असा आयोजकांचा विश्वास आहे. पारायणादरम्यान रामकथेतील विविध प्रसंग आणि त्यामागील जीवनमूल्ये भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत.

**श्रावण आणि रामभक्तीचा आध्यात्मिक संगम**

श्रावण मास हा हिंदू धर्मपरंपरेत भगवान शिवाच्या उपासनेसाठी विशेष पवित्र मानला जातो. भगवान शिव हे प्रभू श्रीरामांचे अनन्य भक्त असल्याची धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे श्रावण मासात रामचरितमानसचे श्रवण आणि रामभक्तीला विशेष आध्यात्मिक महत्त्व असल्याचे आयोजकांनी नमूद केले. श्रावणातील धार्मिक वातावरणात रामचरितमानसाचे सामूहिक श्रवण, सत्संग आणि भक्तिमय वातावरण यामुळे भाविकांना आध्यात्मिक समाधान मिळण्यासोबतच दैनंदिन जीवनातील ताणतणावातून काही काळ निवांत होण्याची संधी मिळणार आहे.

नऊ दिवस भाविकांसाठी आध्यात्मिक पर्वणी

१८ ऑगस्टपासून सुरू होणारे हे नवान्ह पारायण २६ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. दररोज दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत श्री राम मंदिरात धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. त्यामुळे जालना शहर आणि परिसरातील रामभक्तांसाठी नऊ दिवस भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.

या कार्यक्रमात केवळ ज्येष्ठ भाविकांनीच नव्हे, तर युवक, महिला आणि कुटुंबांनीही सहभागी व्हावे, असा आयोजकांचा प्रयत्न आहे. रामचरितमानसातील जीवनमूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीनेही या उपक्रमाला महत्त्व असल्याचे सांगण्यात आले.

**कुटुंबासह उपस्थित राहण्याचे आवाहन**

गोस्वामी तुलसीदास महाराजांची जयंती आणि श्रावण मासाचा पवित्र संगम साधणारा हा नऊ दिवसांचा धार्मिक सोहळा जालना शहरातील भाविकांसाठी विशेष पर्वणी ठरणार आहे. त्यामुळे भाविकांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री रामचरितमानस पारायण आणि सत्संगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीराम मंदिर विश्वस्त आणि श्री राम सुंदरकांड सत्संग परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

### सामनगाव रोडवर....

यावेळी दोन हायवा वाळूसह आढळून आले. पोलिसांनी दोन्ही वाहने ताब्यात घेतली. वाहनांमध्ये वाळूची विनापरवाना वाहतूक होत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्यानंतर संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली.

**दोन हायवा वाळूसह ताब्यात**

पोलिसांनी केलेल्या कारवाईत -१४--०६०७ आणि -४६--८३१० क्रमांकाचे दोन हायवा जप्त करण्यात आले. वाळूसह या दोन्ही वाहनांची एकूण किंमत ४५ लाख ५० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात हायवा चालक इतिहास किसन लष्कर (वय ३०, रा. धावेडी, ता. जि. जालना) आणि श्यामुवेल पावलस महापुरे (वय ३२, रा. गोलापांगरी, ता. जि. जालना) यांच्यासह हायवा मालक राहुल जगन्नाथ शेळके आणि उमेशकुमार रमेशचंद्र मोहता यांच्याविरुद्ध तालुका पोलीस ठाणे, जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**वाळू वाहतुकीच्या परवानगीची तपासणी**

या कारवाईनंतर आता संबंधित वाहनांना वाळू वाहतुकीची अधिकृत परवानगी होती का, वाळू कोणत्या ठिकाणाहून भरली होती आणि ती नेमकी कुठे नेण्यात येत होती, याचा तपास होण्याची शक्यता आहे. तसेच या वाहतुकीमागे आणखी कोणी सहभागी आहे का, याचाही तपास यंत्रणेकडून केला जाऊ शकतो.

अवैध वाळू वाहतुकीमुळे शासनाचा महसूल बुडण्याबरोबरच नदीपात्र आणि पर्यावरणावरही परिणाम होण्याचा धोका असतो. त्यामुळे महसूल विभागासह पोलिसांकडून अशा वाहतुकीवर कारवाई केली जाते. स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे विनापरवाना वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि जालना उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार भाऊराव गायके, गोपाल गौशिक, कैलास खार्डे, दीपक घुगे आणि वसंत घस यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**अवैध वाहतुकीवर पोलिसांचा वॉच**

जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीच्या माध्यमातून होणारी महसूल चोरी रोखण्यासाठी पोलिसांनी कारवाई तीव्र केली आहे. सामनगाव रोडवरील या कारवाईत एकाच वेळी दोन हायवा वाळूसह जप्त करण्यात आल्याने अवैध वाहतूक करणाऱ्यांवर पोलिसांचा वॉच असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, या प्रकरणातील पुढील तपासात वाळूचा स्रोत, वाहतुकीची परवानगी, संबंधित वाहनमालकांची भूमिका आणि या वाहतुकीशी संबंधित अन्य व्यक्तींचा सहभाग याबाबत कोणती माहिती समोर येते, याकडे लक्ष लागले आहे.

### सहाय्यक पोलीस...

होते त्यांना लवकरच महाराष्ट्राचे राज्यपाल व मान्यवरांचे हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे.मुळ गाव किनोळा तालुका बदनापूर येथील रहिवाशी पोलीस उपायुक्त श्री सुभाष भुजंग यांना उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पदक पुरस्कार मिळाल्याबद्दल यांचा स्वतंत्र सैनिक पाल्य समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांच्या वतीने शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

### मनसेची जालन्यात....

नवनिर्माण सेनेत प्रवेश केल्याची माहिती देण्यात आली. विवेक वैद्य, संदीप दांडाई, पवन खांडेभराड, गजानन सरडे, संतोष शेळके आणि विशाल घुमरे यांच्यासह काही कार्यकर्त्यांनी मनसेत प्रवेश केला. नवीन कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे जालना शहर आणि जिल्ह्यात पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला बळ मिळेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. नव्याने पक्षात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांना स्थानिक पातळीवर जबाबदाऱ्या देऊन संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. शहर आणि जिल्ह्यात जनसंपर्क वाढविण्यावर भर जालना शहरासह जिल्ह्यातील विविध स्थानिक प्रश्नांवर मनसेने आक्रमक भूमिका घेण्याचे संकेत बैठकीत देण्यात आले. पाणीपुरवठा, रस्ते, वाहतूक, स्वच्छता, अतिक्रमण, बेरोजगारी आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्यांवर पक्षाने लक्ष केंद्रित करावे, अशी भूमिका कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त झाली.

आगामी काळात स्थानिक पातळीवर नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे यावर भर देण्यात येणार आहे. त्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नियमितपणे जनसंपर्क अभियान राबवावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**महिला संघटनेचाही सहभाग**

बैठकीला मनसेच्या महिला पदाधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती. महिला जिल्हाध्यक्ष रेखा गंगातीवरे आणि सरिता जाधव यांच्यासह महिला कार्यकर्त्यांनी बैठकीत सहभाग घेतला. महिलांशी संबंधित प्रश्नांवर पक्षाच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे काम करण्याबाबतही चर्चा झाल्याचे सांगण्यात आले.

**पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

या आढावा बैठकीस मनसेचे जिल्हाध्यक्ष रविभैया राऊत, जिल्हा उपाध्यक्ष शरद मांगदरे, जिल्हा सचिव विलास तिकांडे, शहराध्यक्ष राहुल रत्नपारखी यांच्यासह विवेक वैद्य, संदीप दांडाई, पवन खांडेभराड, गजानन सरडे, संतोष शेळके, विशाल घुमरे आणि अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जालना जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्याच्या दृष्टीने झालेली ही आढावा बैठक महत्त्वाची मानली जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात आपली उपस्थिती अधिक प्रभावी करण्यासाठी मनसेकडून आगामी काळात कोणती रणनीती आखली जाते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### थॅलेसेमिया मुक्त...

उपक्रमाची सुरुवात ही उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार दामोदर जाधव, पोलीस निरीक्षक सुदाम भागवत, नायब तहसीलदार संजय चंदन, महसूल सेवा कृष्णा सोनवणे, ज्ञानेश्वर ढवळे, आणीबाणी सैनिक प्रकाश दीक्षित, बालासाहेब देवडे, सामाजिक कार्यकर्ते माधवराव (मामा) कदम, व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली.

# महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर २१ ऑगस्ट जलसंधारण दिनी राज्यभर आयोजन

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात ''महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'' ( - ) या उपक्रमाचे असून मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सेक्युअर टूमारो अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात २१ ऑगस्ट रोजी कमाल ३ किलोमीटर (महा वॉकेथॉन) चालणे आणि मृद व जलसंधारणाची शपथ घेणे असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे. शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान ''जलसंधारण अभियान'' आयोजित करण्यात येत आहे. तर २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' ( - ) या उपक्रमाचे आयोजन करुन जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले असून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या लोकचळवळीत राज्यातील सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे होणार असून प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्रमुख जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी हे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सर्व मंत्री, सर्व राज्यमंत्री, राज्यसभा/ लोकसभा/ विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, सर्व जिल्हापरिषद अध्यक्ष/उपाध्यक्ष, सर्व महापौर / उपमहापौर, सर्व नगराध्यक्ष/उपनगराध्यक्ष, सर्व जिल्हापरिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य, सर्व महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत सदस्य आणि इतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, सर्व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील नामांकित व प्रतिष्ठित व्यक्ती / डॉक्टर / कलाकार/ उद्योजक, जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब सदस्य, लायन्स क्लब सदस्य, रनिंग क्लब सदस्य, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, विविध क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, विविध व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला, राज्याचे नागरिक यांना सहभागी करण्यात येणार आहे.

**क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी**

महा वॉकेथॉन मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र मिळणार आहे. तर प्रथम दहा विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सोशल मीडियासाठी हे हॅशटॅग वापरण्यात याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

**जलसंधारण सप्ताह**

१५ ऑगस्ट ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताह दरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करुन इनस्टाग्राम () च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यव्यापी '' '' स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे. याची थीम , , अशी असून सोशल मीडियावर हे हॅशटॅग वापरण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे एकाच हॅशटॅगखाली विक्रमी संख्येने रील्स तयार होऊन मोठ्या डिजिटल सहभागाची नोंद होणार आहे. रील स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचा पात्र वयोगट १५ ते ३० वर्षे असा ठेवण्यात आला आहे. प्रत्येक स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदांची तयार करावी. व्हिडीओ/ रीलच्या सुरुवातीला व्हिडीओ / रीलचा उद्देश, स्वतःचे संपूर्ण नाव, जिल्ह्याचे नाव नमूद सहभागी स्पर्धकांनी करणे आवश्यक आहे. स्पर्धाकांने स्वतःच्या वर पोस्ट करावी. स्पर्धकांनी मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत ला करणे बंधनकारक राहील. यासाठी अधिकृत हॅशटॅग वापरणे अनिवार्य राहणार आहे. स्पर्धेसाठी मान्यता दिलेला एक अधिकृत तयार करण्यात येईल. केल्यानंतर नोंदणी जिल्हा निवड सहभाग प्रमाणपत्र अशी सोपी प्रक्रिया असणार आहे. हॅशटॅगबरोबर स्वतंत्र डिजिटल नोंदणी केल्यामुळे शासनाकडे प्रत्येक सहभागीची अधिकृत नोंद उपलब्ध राहणार आहे. रील्स अपलोड करण्याचा कालावधी १५ ते २१ ऑगस्ट २०२६ असा आहे. **रील्स बनवण्यासाठी विषय** माती संवर्धन, पाणी बचत, मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक मृद व जलसंधारण पद्धती, माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना, आजचे संवर्धन उद्याचे सुरक्षित भविष्य असे रील्स बनवण्यासाठी विषय देण्यात आले आहेत.

रील्स बनवितांना किंवा अन्य नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करता येणार आहे. मात्र रीलचा मुख्य संदेश माती आणि पाणी संवर्धनाशी संबंधित असणे आवश्यक राहणार आहे.

रील्स करिता गुणांकन पद्धती पुढील प्रमाणे असणार आहे. विषय व संदेश - ३० गुण, कल्पकता -२५ गुण, प्रभावी सामाजिक संदेश - २० गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्ता - १५ गुण, - १० गुण असे एकूण - १०० गुण असणार आहेत. केवळ किंवा वर विजेता निश्चित न करता तज्ज्ञ परीक्षण आणि या दोन्हींचा समतोल ठेवण्यात येणार आहे. गुणांकानुसार विजेत्याची निवड करण्यात येईल.

संपूर्ण राज्यासाठी एकच अधिकृत हॅशटॅग वापरण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रील्स आणि राज्यभरातून १० हजार रिल्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून लाखो नागरिकांपर्यंत डिजिटल स्वरूपात मृद व जलसंधारणाचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. रील स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार ₹२५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार ₹१५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार ₹१० हजार व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना विशेष 'युवा मृद-जलदूत' म्हणून गौरविण्यात येणार आहे

''एक ... मातीसाठी !, एक ... पाण्यासाठी !, एक ... सुरक्षित भविष्यासाठी !'' हा रील्स प्रचारासाठी मुख्य संदेश आहे.

**जलसंधारण अभियान**

या स्पर्धेसोबतच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या जलसंधारण अभियानादरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा (जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचे महत्व, जल है तो कल है, जलसंवर्धन उपाय, घरातील पाण्याचा वापर - ), चित्रकला / पोस्टर स्पर्धा- जलसंवर्धन उपाय, पाणी बचत उपाय, ., वाद-विवाद स्पर्धाः (विषय- जलसंधारण शासनाची जबाबदारी कि जनतेची जबाबदारी, इतर विषय), एक शाळा- एक शोषखड्डा उपक्रम राबविणे, सर्व शाळांमध्ये पाणी बचतीचे महत्व विद्यार्थांना सांगणे., जलमित्र / जलदूत घोषित करणे, २१ ऑगस्ट रोजी शाळेत माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करणे, २१ ऑगस्ट रोजी मृद व जलसंधारणाची शपथ घेणे, २१ ऑगस्ट रोजी प्रमाणपत्र /सन्मानचिन्ह / पुरस्कार वितरण करणे, २१ ऑगस्ट रोजी गावातील किंवा शहरातील जलतज्ञ/प्रतिष्ठीत व्यक्ती यांना प्रमुख पाहूणे म्हणून आमंत्रित करणे असे कार्यक्रम घेण्यात यावेत. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना २६ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मृद व जलसंधारण विभागाचे पुढील सोशल मीडिया अकाऊंट आहेत.

**गजानन पाटील,**
**विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.**

# सार्वजनिक मालमत्ता कोणीही वेठीस धरू शकत नाही: ओरिसा उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**जालना - प्रतिनिधी**

प्रलंबित देयकांच्या वसुलीसाठी कोणताही कंत्राटदार सार्वजनिक मालमत्तेला कुलूप लावून किंवा तिचा ताबा घेऊन सरकारला किंवा नागरिकांना वेठीस धरू शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल ओरिसा उच्च न्यायालयाने दिला आहे. सरकारी कामाची रक्कम थकल्यामुळे कंत्राटदाराने सार्वजनिक मैदानास कुलूप लावल्याची कृती बेकायदेशीर ठरवत, न्यायमूर्ती डॉ. संजीव कुमार पाणिग्रही यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्या कंत्राटदाराला कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. कायद्याला हातात घेऊन सार्वजनिक मालमत्तेचा वापर रोखणे हे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

सदर प्रकरण कटक जिल्ह्यातील महापुरुष श्री अच्युतानंद मिनी स्टेडियमच्या बांधकामाशी संबंधित आहे. याचिकाकर्ते कंत्राटदार, नृसिंह चरण मुदुली यांना हे काम देण्यात आले होते. प्रकल्पाची अंदाजित किंमत १,२७,८०,००० रुपये असताना त्यांना केवळ ८२,००,००० रुपये मिळाले. उद्घाटनापूर्वी अधिकाऱ्यांच्या तोंडी विनंतीवरून त्यांनी सुमारे ६०,००,००० रुपयांची अतिरिक्त कामे स्वखर्चाने केली. मात्र, वारंवार मागणी करूनही अंतिम देयक न मिळाल्याने आणि आर्थिक अडचणीत आल्याने त्यांनी मैदानास कुलूप लावले. या कृतीनंतर, तहसीलदारांनी उपविभागीय दंडाधिकारी () यांच्याकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १५२ अंतर्गत, दंडाधिकाऱ्यांनी २१ फेब्रुवारी २०२६ रोजी कंत्राटदाराला सुनावणीची संधी न देता कुलूप तात्काळ काढण्याचा एकतर्फी आदेश दिला. या आदेशाला कंत्राटदाराने उच्च न्यायालयात आव्हान दिले. सुनावणी न घेता नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे उल्लंघन झाले आहे आणि देयके थकल्याच्या मूळ कारणाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला. उच्च न्यायालयाने कंत्राटदाराचे सर्व युक्तिवाद फेटाळून लावले. न्यायमूर्ती पाणिग्रही यांनी नमूद केले की, मिनी स्टेडियम ही सरकारी जमिनीवरील सार्वजनिक मालमत्ता आहे आणि याचिकाकर्त्याच्या कृतीमुळे नागरिकांच्या वापरात अडथळा निर्माण झाला. देयके थकली असली तरी, त्यासाठी कायदेशीर मार्गांचा अवलंब करणे आवश्यक आहे. स्वतःहून कायदा हातात घेणे किंवा सार्वजनिक मालमत्तेचा ताबा घेणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे उपविभागीय दंडाधिकाऱ्यांच्या आदेशात कोणतीही त्रुटी नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. या निकालावर प्रतिक्रिया देताना, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, अ‍ॅड. महेश एस. धन्नावत यांनी सांगितले की, ''ओरिसा उच्च न्यायालयाचा हा निकाल एक महत्त्वाचा पायंडा घालणारा आहे. अनेकदा सरकारी कंत्राटदारांची देयके वेळेवर मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

# चितळी पुतळीत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**चितळी पुतळी - प्रतिनिधी**



ग्रामपंचायत चितळी पुतळी येथे १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात संपन्न झाला. गावच्या प्रथम नागरिक तथा सरपंच/प्रशासक सौ. स्वप्ना राजेंद्र वांजुळे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण करण्यात आले.तर

ध्वजारोहणापूर्वी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर माऊली काकडे व माऊली उरदुखे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर सरपंच सौ. स्वप्ना वांजुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत स्वातंत्र्य दिनाचा उत्साह साजरा केला. कार्यक्रमास ग्रामसेवक श्रीमती ए. एस. धांडे, उपसरपंच कल्याणराव उरदुखे, मुख्याध्यापक दवंडे सर, तसेच ढाकणे सर, मोहिते सर, पळसकर सर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व कवायती सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शाळेच्या शिक्षकवृंदाने स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व विशद केले.

# कर्तव्यनिष्ठेची धगधगती मशाल 'तुकाराम'

मराठवाड्यातील एका अत्यंत दुर्गम भागातून आणि सामान्य शेतकरी कुटुंबातून आलेल्या, आपल्या अफाट कर्तृत्वाने संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रशासकीय वर्तुळात आदर्श निर्माण करणारे धडाकेबाज आय.ए.एस () अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या संघर्षाची गाथा म्हणजेच 'तुकाराम' हे पुस्तक होय. ज्येष्ठ पत्रकार आणि लेखक शफी पठाण यांनी लिहिलेले आणि 'न्यू ईरा पब्लिशिंग हाऊस' यांनी प्रकाशित केलेले हे पुस्तक केवळ एका अधिकाऱ्याचे चरित्र नाही, तर ती प्रामाणिकपणाची आणि व्यवस्थेविरुद्ध लढण्याची एक धगधगती मशाल आहे. लेखक शफी पठाण यांनी पुस्तकाला दिलेले 'तुकाराम' हे नाव अत्यंत विचारपूर्वक आणि समर्पक आहे. १७ व्या शतकात संत तुकाराम महाराजांनी ज्याप्रमाणे समाजातील ढोंगीपणा, अपप्रवृत्ती आणि विषमतेवर आपल्या अभंगांतून तीव्र प्रहार केले, त्याचप्रमाणे २१ व्या शतकातील हा तुकाराम (तुकाराम मुंढे) प्रशासनातील भ्रष्टाचार, राजकीय ढोंगबाजी आणि अकार्यक्षमतेवर आपल्या कर्तव्यकठोर निर्णयांचे आसूड ओढले आहे.ओढत आहे. सुमारे २१० पानांच्या या पुस्तकात लेखकाने एका प्रामाणिक अधिकाऱ्याचा संपूर्ण जीवनपट आणि त्यांच्या बदल्यांमागील सत्य अतिशय धाडसाने मांडले आहे.

पुस्तकाला प्रस्तावना तुकाराम मुढेंना घडविणारे त्यांचेजेष्ठ बंधू अशोक मुंढे यांची आहे.आपल्या प्रस्तावनेत ते लिहीतात...


आधी गरीबीशी आणि नंतर व्यवस्थेशी दोन हात करताना तुकाराम ने कधीही शॉर्टकट निवडला नाही. त्याला जसा भाकरीसाठी संघर्ष करावा लागला तसाच संघर्ष शिक्षणासाठी त्याच्या वाटेला आला. प्रतिकूल परिस्थितीच्या छाताडावर पाय देऊन अविचल चालत राहिला, कारण त्याच्या पोटातील भुकेपेक्षा डोळ्यातील स्वप्नांची भूक जास्त मोठी होती. प्रशासकीय सेवेतील पद केवळ अधिकार गाजवायचे स्थान नाही तर ते गरिबांचे अश्रू पुसण्याचे साधन आहे. या पदापर्यंत पोहोचण्यासाठी केवळ बुध्दमत्ता असून उपयोग नसतो, तर दशकांची परिश्रम निष्कलंक चारित्र्य आणि आढळ निर्णय क्षमता ही कशी आवश्यक असते याकडे या पुस्तकात ठळकपणे लक्षवेध देण्यात आले आहे.

२१० पानांचे हे पुस्तक वाचकाला पहिल्या पानापासून खिळवून ठेवते. पुस्तकाची मांडणी प्रामुख्याने दोन भागांत विभागलेली असल्याचे दिसते.

१. आयएएस होण्यापूर्वीचा अभावांनी भरलेला बालपण व तरुणपणाचा काळ.प्रतिकूल परिस्थितीत केलेले मार्गक्रमण.

२. आयएएस झाल्यानंतरचा आपली तत्त्व,विचार, यांचे बरोबर प्रामाणिक राहून व्यवस्थेशी आणि राजकीय दबावाशी आलेला थेट संघर्षाचा काळ.

पुस्तकाची सुरुवात तुकाराम मुंढे यांच्या ग्रामीण भागातील बालपणापासून होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती, गरिबी आणि सोयी-सुविधांचा अभाव असतानाही केवळ अभ्यासातील चिकाटी आणि आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. कोणत्याही महागड्या कोचिंग क्लासशिवाय, केवळ स्वतःच्या जिद्दीवर त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची () परीक्षा पहिल्याच प्रयत्नात देशात विसाव्या क्रमांकाने उत्तीर्ण केली. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या आजच्या हजारो तरुणांसाठी मुंढे यांच्या संघर्षाचा हा पूर्वार्ध प्रचंड ऊर्जा आणि प्रेरणा देणारा आहे. कर्तव्यकठोर कारकीर्द आणि धडाकेबाज निर्णय पुस्तकाचा उत्तरार्ध हा तुकाराम मुंढे यांच्या आयएएस ()




झाल्यानंतरच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकतो. सोलापूर, नवी मुंबई, नाशिक, नागपूर, पुणे आणि मुंबई ( व आरोग्य विभाग) अशा विविध ठिकाणी काम करताना त्यांनी नेहमी सर्वसामान्य नागरिक हाच आपल्या प्रशासनाचा केंद्रबिंदू ठेवला. पुस्तकात त्यांच्या अनेक ऐतिहासिक मोहिमांचे चित्तवेधक वर्णन आहे.

वाळू माफियांचा थरार: सोलापूर जिल्ह्यात असताना थेट नदीपात्रात उतरून वाळू माफियांविरुद्ध केलेली धडक कारवाई.

नवी मुंबई आणि नाशिक महानगरपालिकेत आयुक्त असताना बेकायदेशीर बांधकामे आणि बड्या नेत्यांच्या दबावाला झुगारून केलेली अतिक्रमण मोहीम.

वॉल्क विथ कमिशनर: प्रशासकीय दारे जनतेसाठी खुली करून थेट संवाद साधणारा आणि तक्रारींचे जागेवर निवारण करणारा लोकप्रिय उपक्रम त्यांनी राबविला.

लेखकाने या सर्व घडामोडींचे वर्णन करताना, मुंढे यांच्या निर्णयांचे केवळ उदात्तीकरण न करता, त्या निर्णयांच्या मागे असलेली कायदेशीर भूमिका आणि दूरदृष्टी अतिशय तांत्रिक व सोप्या भाषेत समजावून सांगितली आहे.

या पुस्तकाचा सर्वात अस्वस्थ करणारा भाग म्हणजे तुकाराम मुंढे यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्या. राजकारणी आणि भ्रष्ट साखळीला मुंढे यांची नियमांवर बोट ठेवण्याची वृत्ती कधीच रुचली नाही. त्यामुळे त्यांना त्यांच्या साधारण २३ वर्षांच्या सेवेत २५ हून अधिक बदल्यांना सामोरे जावे लागले. एका प्रामाणिक अधिकाऱ्याला आणि त्याच्या कुटुंबाला या बदल्यांमुळे किती मानसिक आणि सामाजिक त्रास सहन करावा लागतो, याचे अत्यंत संवेदनशील चित्रण लेखकाने केले आहे.प्रामाणिक पणाची किंमत त्यांना मोजावी लागली. परंतु, प्रत्येक बदलीकडे एक नवी संधी म्हणून पाहत, नवीन ठिकाणी तितक्याच जोमाने काम सुरू करण्याची मुंढे त्यांची जिद्द वाचकाला थक्क करते. शफी पठाण यांना २५ वर्षांपेक्षा जास्त काळ पत्रकारितेचा दांडगा अनुभव आहे. त्यांनी महाराष्ट्राचे राजकारण आणि समाजकारण अतिशय जवळून पाहिले आहे. त्यामुळे या पुस्तकाची भाषा वृत्तपत्रीय शैलीची, प्रवाही आणि थेट वाचकाच्या मनाचा ठाव घेणारी आहे. लेखकाने कुठेही अतिशयोक्ती न करता, मुंढे यांच्यातील संवेदनशील माणूस, त्यांची तत्त्वनिष्ठा आणि कधीकधी त्यांच्या स्वभावातील कडकपणा या दोन्ही बाजूंचे वस्तुनिष्ठ () चित्रण केले आहे. यामुळे हे चरित्र एकांगी न वाटता अत्यंत वास्तववादी वाटते. बाजारात आल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या, यावरूनच या पुस्तकाची लोकप्रियता सिद्ध होते. हे पुस्तक वाचल्यानंतर समाज म्हणून आपण कुठे कमी पडतोय, हा विचार प्रत्येक वाचकाच्या मनात चक्रावून जातो. ''जर व्यवस्था बदलण्यासाठी एका तुकाराम मुंढेंची गरज असेल, तर आपण नागरिक म्हणून त्यांना किती साथ देतो?'' हा थेट प्रश्न हे पुस्तक आपल्याला विचारते.

अवघ्या काही आठवड्यांत लाखो प्रतींची विक्री झालेले हे पुस्तक मराठी साहित्यातील एक मैलाचा दगड मानले जात आहे. हे पुस्तक वाचकाला विचार करायला लावते की, जर एका तुकाराम मुंढेंनी ठरवले तर ते संपूर्ण व्यवस्था बदलू शकतात. मग आपल्या देशात असे अनेक अधिकारी का निर्माण होत नाहीत? अधिकाऱ्यांमध्ये ईच्छाशक्तीचा अभाव हेच महत्त्वाचे कारण आहे.

स्पर्धा परीक्षेचे विद्यार्थी आयएएस, आयपीएस बनू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी हे पुस्तक दीपस्तंभा सारखेच आहे.

सामान्य नागरिकांना लोकशाहीत अधिकारांचा योग्य वापर कसा करावा, हे समजून घेण्यासाठी.तसेच प्रशासकीय अधिकार्यांना दबावाखाली काम करतानाही स्वतःची निष्ठा कशी जपायची, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

'तुकाराम' हे पुस्तक केवळ एका सनदी अधिकाऱ्याची यशोगाथा नाही, तर तो देशातील तरुण पिढीसाठी आणि प्रशासकीय व्यवस्थेसाठी एक मार्गदर्शक ग्रंथ आहे. न्यू ईरा पब्लिशिंग हाऊसने या पुस्तकाची मांडणी आणि मुखपृष्ठ अत्यंत दर्जेदार केले आहे. प्रत्येक मराठी वाचकाने, विशेषतः विद्यार्थ्यांनी, अधिकाऱ्यांनी आणि सुजाण नागरिकांनी आवर्जून वाचावे आणि संग्रही ठेवावे असे हे एक अप्रतिम आणि प्रेरणादायी पुस्तक आहे.

पुस्तकाची अर्पणपत्रीका सुध्दा समर्पक आहे. नैतिक मूल्यांच्या भक्कम पायावर स्वाभिमानी समाज घडवू पाहणाऱ्या विवेकवादी लोकांना... आणि

डोळ्यात रंगणाऱ्या भव्य स्वप्नांच्या पूर्ततेसाठी झपाटल्यागत दिवस-रात्र अपार कष्टाची पराकाष्टा करणाऱ्या आदीम जिद्दीच्या तरुणाईला ''तुकाराम'' हे पुस्तक सादर समर्पित केले आहे.

१७ जुलै रोजी पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात पुस्तकाचे प्रकाशन झाले. रसिकांचा उदंड प्रतिसाद कार्यक्रमाला होता. या कार्यक्रमाला एबीपी माझाचे संपादक राजू खांडेकर, ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे,सरहद संस्थेचे संस्थापक संजय नहार, तुकाराम मुंढे यांचे बंधू अशोक मुंढे, तसेच माजी सनदी अधिकारी संग्राम गायकवाड, लेखक शफी पठाण यांचे सह हजारो चाहते, स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे हजारो युवक उपस्थित होते.

१८ जुलैला मी हे पुस्तक ''बुक गंगा''. पुणे यांच्याकडून मागविले. १८८ रुपये पुस्तकाचे अधिक ३९ रुपये पोस्ट चार्जेस असे २२७ रुपयात अवघ्या दोनच दिवसात पुस्तक मला पुण्यात घरपोच मिळाले.

पुस्तकाचे नाव '' तुकाराम ''
लेखक-शफी पठाण.
न्यू इरा पब्लिकेशन. किंमत २५०



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**८९९९५६६९१७**

# नवनाथ वाघमारे यांच्या कथित वक्तव्याविरोधात जालन्यात मराठा क्रांती मोर्चा आक्रमक

## कदीम जालना पोलीस ठाण्यासमोर धरणे आंदोलन; तक्रारीनंतर अखेर गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

ओबीसी समाजाचे नेते नवनाथ वाघमारे यांनी पुणे येथे मराठा समाजातील एका महिलेबद्दल कथितरीत्या आक्षेपार्ह व अपशब्दांचा वापर केल्याचा आरोप करत जालन्यात मराठा क्रांती मोर्चा आक्रमक झाला आहे. संबंधित वक्तव्याचा निषेध करत वाघमारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी सोमवारी (१७ ऑगस्ट) कदीम जालना पोलीस ठाण्यासमोर मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर पोलिसांनी तक्रार स्वीकारून नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.मराठा क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी वाघमारे यांच्या कथित वक्तव्यामुळे मराठा समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप केला. संबंधित वक्तव्याची चौकशी करून कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

**पोलिस ठाण्यासमोर ठिय्या**

सोमवारी सकाळपासून मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी आणि समाजबांधव कदीम जालना पोलीस ठाण्याच्या परिसरात एकत्र आले. आंदोलकांनी नवनाथ वाघमारे यांच्या कथित वक्तव्याचा निषेध करत संबंधित प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची मागणी लावून धरली.

या वेळी आंदोलकांनी पोलिस प्रशासनाकडे तक्रार करून संबंधित वक्तव्याची सत्यता, त्याची पार्श्वभूमी आणि त्यातून कायदेशीरदृष्ट्या कोणते गुन्हे घडतात, याची चौकशी करण्याची मागणी केली. प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही देण्यात आल्याचे आंदोलकांकडून सांगण्यात आले.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर गुन्हा दाखल**

आंदोलनादरम्यान मराठा क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधिकाऱ्यांशी चर्चा केली. पदाधिकाऱ्यांच्या भावना आणि तक्रारीची दखल घेत उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांना आवश्यक सूचना दिल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

त्यानंतर मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयक तथा संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या जालना शहराध्यक्षा सुवर्णाताई वाघ (राऊत) यांच्या तक्रारीवरून नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.



पोलिसांनी तक्रारीच्या आधारे भादंवि कलम ७९, १९६(१), ३५३(२) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल केल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेत निश्चित होणार आहे.

**वक्तव्याची चौकशी करण्याची मागणी**

आंदोलकांनी संबंधित वक्तव्याचा संदर्भ तपासून त्याची कायदेशीर चौकशी करण्याची मागणी केली आहे. एखाद्या समाजातील व्यक्ती किंवा महिलेबद्दल सार्वजनिक व्यासपीठावरून कथितरीत्या आक्षेपार्ह वक्तव्य केल्यास त्यातून सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारच्या वक्तव्यांची गांभीर्याने दखल घेण्यात यावी, अशी भूमिका मराठा क्रांती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली.

दरम्यान, प्रकरणाचा तपास सुरू असून नवनाथ वाघमारे यांची बाजू तसेच संबंधित वक्तव्याचा मूळ संदर्भ तपासात स्पष्ट होणे महत्त्वाचे ठरणार आहे. पोलिस तपासातून या प्रकरणातील वस्तुस्थिती काय आहे, हे समोर येणार आहे.

**कायदेशीर भूमिका मांडणार**

या प्रकरणात मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने ॲड. शैलेश देशमुख हे कायदेशीर भूमिका मांडत आहेत. तक्रारीतील आरोप, संबंधित वक्तव्य आणि लागू करण्यात आलेल्या कायदेशीर तरतुदींच्या आधारे पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

**मोठ्या संख्येने समाजबांधवांची उपस्थिती**

आंदोलनावेळी मराठा क्रांती मोर्चाचे अशोक पडुळ, संतोष गाजरे, संदीप ताडगे, विश्वंभर तिरुखे, प्रशांत वाडेकर, नगरसेवक महेश निकम, ॲड. शैलेश देशमुख, गणेश शिंदे, प्रल्हाद शिरसाट, संध्याताई देठे, सुवर्णाताई वाघ, नीता वझरकर, सीमाताई काकडे, शरद मांगधरे, योगेश शिंदे, विकास शिंदे, शरद शिंदे, भरत मानकर, परमेश्वर सपकाळ, गजानन देशमुख, पंकज बागल, विलास भालेकर, बाबा राऊत, सचिन नाईकवाडे, योगेश पाटील, पांडू पवार, श्रीकांत पवार, गणेश थोरात, धनंजय पोहेकर आणि बाळासाहेब बरसाले यांच्यासह मराठा समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सामाजिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर प्रकरणाला महत्त्व**

मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावर राज्यात गेल्या काही काळापासून सामाजिक व राजकीय पातळीवर तीव्र चर्चा सुरू आहे. अशा संवेदनशील वातावरणात विविध समाजघटकांशी संबंधित नेत्यांकडून होणाऱ्या वक्तव्यांमुळे वाद निर्माण होण्याची शक्यता असते.

त्यामुळे जालना येथे दाखल झालेल्या या गुन्ह्याच्या तपासाकडे आता लक्ष लागले आहे.पोलिसांकडून संबंधित वक्तव्याचा नेमका संदर्भ, त्याची सत्यता आणि त्यातील कायदेशीर बाबी तपासल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे या प्रकरणाच्या तपासातून नेमके काय निष्पन्न होते, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

# थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र'च्या संकल्पनेतून शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत जनजागृती

**परतूर - प्रतिनिधी**

परतुर येथे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ब्लड साथी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने १५ ऑगस्ट २०२६ रोजी 'थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्रव्यापी थॅलेसेमिया व स्वैच्छिक रक्तदान जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये थॅलेसेमिया आणि रक्तदानाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

या अभियानात शहरी भागासोबतच ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत थॅलेसेमिया जनजागृतीचा संदेश पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात आला. थॅलेसेमिया हा रक्ताचा आनुवंशिक विकार असून, थॅलेसेमिया मेजर




रुग्णांना नियमित रक्ताची आवश्यकता असते. त्यामुळे अशा रुग्णांसाठी नियमित आणि सुरक्षित रक्त उपलब्ध राहण्यासाठी स्वैच्छिक रक्तदात्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नागरिकांना सांगण्यात आले.

अभियानादरम्यान थॅलेसेमिया मायनर () आणि थॅलेसेमिया मेजर () याबाबत माहिती देण्यात आली. तसेच थॅलेसेमियाबाबत असलेले गैरसमज दूर करणे, जनजागृती वाढविणे आणि आवश्यक तेथे तपासणी व वैद्यकीय मार्गदर्शन घेण्याचे महत्त्व नागरिकांना समजावून सांगण्यात आले.

यासोबतच स्वैच्छिक रक्तदानाचे महत्त्व, सुरक्षित रक्तदानाबाबतचे गैरसमज आणि नियमित रक्तदानामुळे गरजू रुग्णांना मिळणारी मदत याबाबतही जनजागृती करण्यात आली. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागात रक्ताची गरज भासल्यास वेळेवर रक्त उपलब्ध होण्यासाठी स्थानिक पातळीवर नियमित रक्तदात्यांचे मजबूत नेटवर्क निर्माण करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली.

"एक रक्तदाता अनेक जीव वाचवतो" या संदेशातून अधिकाधिक नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदानाच्या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

ब्लड साथी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून थॅलेसेमिया रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देणे, स्वैच्छिक रक्तदानाची चळवळ मजबूत करणे आणि समाजातील शेवटच्या घटकापर्यंत रक्तदान व आरोग्यविषयक जनजागृती पोहोचविणे यासाठी सातत्याने कार्य करण्यात येणार असल्याचे ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष ॲड. अक्षय बाहेती यांनी सांगितले. सदरील *(पान २ वर)*

# कोठारी स्कूलची शिस्त व संस्कार कौतुकास्पद-आ.अर्जुनराव खोतकर

**जालना - प्रतिनिधी**

कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलची कोठारी स्कूलची शिस्त आणि संस्कार कौतुकास्पद आहेत, असे गौरवोद्गार माजी मंत्री आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलताना काढले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, मेहनत, संस्कार आणि देशप्रेम अंगीकारून देशाचे जबाबदार नागरिक बनावे, असे प्रेरणादायी आवाहन त्यांनी केले.




कोठारी इंटरनॅशनल ड्रीम स्कूलमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशभक्ती, उत्साह आणि अत्यंत दिमाखात साजरा करण्यात आला. प्रारंभी आ. खोतकर यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

त्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले, शिवसेना गटनेते तथा नगरसेवक दीपक राठोड, रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा मधुलता भक्कड, शाळेचे सचिव प्रसन्नाकुमार कोठारी, संचालिका सौ. तृप्ती बंब-कोठारी आणि प्राचार्य अरुणकुमार पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शाळेच्या संचालिका सौ. तृप्ती बंब- कोठारी म्हणाल्या की, प्रत्येकाने आपली जबाबदारी मनापासून स्वीकारून कठोर परिश्रमाला स्मार्टवर्कची जोड दिली तर कोणतेही ध्येय अशक्य नाही. एक टीम, एक विचार आणि एक ध्येय यातूनच यशाची भव्य वाटचाल घडते.

विद्यार्थ्यांनी सादर केलेली देशभक्तीपर गीते, मनमोहक नृत्ये, स्वातंत्र्यसैनिकांच्या वेशभूषेतील सादरीकरणे आणि प्रभावी भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली. तिरंगी फुगे, आकर्षक सजावट आणि देशभक्तीपर वातावरणाने संपूर्ण शालेय परिसर उजळून निघाला होता. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमातील प्रत्येक उपक्रमातून शिस्त, आत्मविश्वास, संस्कार आणि देशप्रेमाचे सुंदर दर्शन घडविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी तीर्था जैन आणि श्रेया बागल यांनी केले तर सृष्टी कोळकर हिने आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.